**श्री हरिहर सद्गुरु शक्तीपीठ**

**श्रीरेणुकामाता मंदिर औरंगाबाद**

श्री गणेशाय नमः

आधी नमोनी विघ्नेश्वरासी |शरण जाऊ शिवशक्तिसी |

योग पीठासन शक्तिसी |नमन माझे निरंतर ||१||

कुलस्वामिनी रेणुकामाता |तिचे चरणी माझा माथा |

योग पीठासन स्वरुपस्थिता |तीच असे सर्वकाळ ||२||

सदगुरुसी करुनी नमन |माता पितरांचे वंदिले चरण |

वडील बंधू इष्ट मित्रं जाण| सकला नमन असो पहा||३||

चारीवर्णी स्थावर जंगम |सकला ठाई एकची ओम |

परब्रम्ह असे हेची सुगम |दर्शना आनंद मिळेल बा ||४||

निर्गुण निराकार झाले सगुण |त्रिगुणात खेळे शक्ती जाण |

त्रिगुणातीत पुनरपी होऊन |परमानंद मिळेल पहा ||५||

म्हणोनी हा बालक शरण आला |शिवशक्ती चरणी लागला |

देई मज आता अभयाला |हीच विनंती आपुले पायी ||६||

रेणुकाई म्हणजे आपुले स्वरूप |सेवा करून घ्यावी अमुप |

साक्षात्कारे रिझवावे मन |सर्वकाळ ||७||

विद्या शिकलो नाही पूर्णपणे |व्यावहारिक ज्ञान राहिले उणे |

तूच आता सांभाळून घेणे |अज्ञान या बालकासी ||८||

अखंड घडो आपुली सेवा |व्यसन नसावे कोणते जीवा |नम

ःस्मरणाचा मुखी द्यावा ठेवा |हीच विनंती आईचे पायी ||९||

आई बाप स्वरूप एकची पाही |दुजाभाव राहिला नाही |

एकत्वे सेवा घडू द्यावी |सर्वकाळ ||१०||

वेद विहित कर्म घडावे |भक्ती मार्गासी लावावे |

अध्यात्म शास्त्र चोखाळावे । सद्‌गुरू कृपे ।।११।।

सदगुरू कृपा व्हावी बालकावर । आईची सेवा करीन निरंतर ।

परमानंद लुटीन वारंवार । विदेह स्थिती होवोनिया ।।१२।।

प्रपंचात मी राहीन । व्यवहाराचे द्यावे ज्ञान ।

धंदा रोजगार हा वाढवून । धन संपत्ती मिळोबा ।।१३।।

धन संपत्ती हि मिळवून दान धर्म घडो जाण ।

साधू संत सेवा हि होऊन । मन स्थिर राहावे ।।१४।।

भजन पूजन घडो द्यावे । यज्ञ याग हे घडवावे ।

वेद पठणे आळवावे । तुजसी आई निरंतर ।।१५।।

कृपा दृष्टी ठेवावी बालकावरी । नित्य धंदा मजुरी द्यावी तरी ।

तेजोन्नत्ती वाढवावी खरी । आपुले सत्ते करोनिया ।।१६।।

धंदा म्हणजे आत्मसाधनच होई । मजुरी म्हणजे चित्ती समाधान देई ।

संतोष वाढवूनी बुडवी आनंदी डोही । आपुले सत्ते करोनिया ।।१७।।

आनंदी आनंदात मिळवून । विदेह स्थिती समाधी भोगून ।

आत्म स्वरूपी राहून । कर्तव्यासी जागवी ।।१८।।

कुणाचे ऋणात ठेवू नको । कर्जवाढ होऊ देऊ नको ।

आत्म स्वरूपा भुलवू नको । हीच विनंती आईचे पायी ।।१९।।

अपयशाचा वाटा नसावा । आत्मबोध हा ठसवावा ।

अहंकार हा रिझवावा । आपुले सत्ते करोनिया ।।२०।।

उपासना घडावी सगुण । मुखी असावे नाम चिंतन ।

घडो द्यावे भजन पूजन । व्रत वैकल्ये दान धर्म हा ।।२१।।

सद आचार सद विचार । सत्संग साधू बोध साचार ।

घडो द्यावा हाची फार |आपुले कृपे करोनिया ||२२||

जितुके मागावे तितुके थोडे |बुद्धी भ्रंश गात्र झाले वेडे |

काही सुचेना काय करावे गडे |आई आई म्हणो आता ||२३||

मनाची झाली ऐसी चंचलता |आसन लावले एकाग्र चित्ता |

डोळे झाकिले तत्वता |नाम चिंतन सुरु केले ||२४||

जगदंब जगदंब म्हणत |मोठ मोठ्याने आरोळ्या देत |

कंठ दाटून गहिवर येत |स्वरूप दावी शिवशिवा ||२५||

सगुण साकार स्वरूप दाखवावे |डोळ्याचे पारणे फेडावे |

आत्म स्वरूपात लीन करावे |तगमग होतसे मनासी ||२६||

ऐसी मनी तगमग होता| मन झाले दूर तत्वता |

बुद्धीची होऊन एकाग्रता |चित्त जागी स्थिरावले ||२७||

चित्त जागी स्थिरताची |अहंकार वृत्ती गेली साची |

प्रगटोनी शिवशिवा तेची |ऐक्य रूप होवोनिया ||२८||

समोर पाहता स्वरूपाला |एका एकी कंठ दाटला |

सर्वांगी घाम फुटला |स्तब्दधा आली सर्वांगी ||२९||

वार्ता नाही अज्ञानाची |ज्योत प्रगटली ज्ञान स्वरूपाची |

चित्ती आल्हाद मावेना तोचि |परमानंद होतसे ||३०||

सगुण साकार मूर्ती प्रगटली |शिवशक्ती ऐक्य रूप ठेली |

त्यांचे चरणी आता वंदिली |अति प्रेमे करोनिया ||३१||

शिवपार्वती उभे जोडीने पहिले ह्याच नयनाने |

दंडवत केले प्रेमाने |शिवशिवा ऐक्य होई ||३२||

पार्वतीचेच रूप पहिले |तेची रेणुका स्वरूप झाले |

प्रत्यक्ष डोळ्यापुढे दिसू लागले । आनंद जीव होतसे ॥३३॥

रेणुकाई प्रत्यक्ष प्रगटुन । बोलू लागली प्रेमे जाण ।

अभय देतसे वरदान । अति प्रेमे करोनिया ॥३४॥

हे स्थळ क्षेत्र होईल । तीर्थ माझे येथ राहील ।

योग पिठासनी मी बसेन । अति प्रेमे करोनिया ॥३५॥

सेवा घेईन सर्व भक्तांची । मनोकामना पुरविन सर्वांची ।

वंश परंपरा वाढवील साची । भक्तराज बोलल्याप्रमाणे ॥३६॥

जो चार अक्षरे जपेन । जगदंब जगदंब ऐसे म्हणेन ।

त्याची दुष्टाक्षरे पुसीन ललाटावरची ॥३७॥

तो निर्भय नांदेल जगात । सर्व ऐश्वर्य होईल कीर्तिवंत ।

शेवटी मिळेल आत्मस्वरूपात । कृतकृतार्थ होईल बा ॥३८॥

ऐसा आशीर्वाद देऊन रेणुकाई गुप्त राहिली जाण ।

भक्त पाही डोळे उघडून । समोर काही दिसेना ॥३९॥

आई गुप्त न होऊन । योग पिठासनी राहिली जाण ।

अखंड करावे तिचे ध्यान । भजन पूजन हे करावे ॥४०॥

हाची आदेश आईने दिला । भक्त मनी संतोषला ।

करोनी घेई आई सेवेला । म्हणोनी नमन करो पहा ॥४१॥

सगुण साक्षात्कार हाची झाला । ऐसा मनी मानला ।

तोचि ध्यान ठेविला । सर्वकाळ ॥४२॥

आईने काय सांगितले । ते पुनरपी मनी आठविले ।

तैसे वागावे आता भले । तरीच सार्थक देहाचे ॥४३॥

चार अक्षरे तू जपावे । जगदंब जगदंब ऐसे म्हणावे ।

दोन अक्षरे अखंड घ्यावे ।सोहम सोहम म्हणोनिया ।।४४।।

सर्व स्वरूपाची कल्पना ।एकची करावी जाणा ।

त्यातची पहाव्या आईच्या खुणा ।सर्वकाळ ।।४५।।

आई नटली जगदंतरी ।ब्रम्ह स्वरूपी हीच खरी ।

भेद न उरला अंतरी ।अद्वैत रूपे राहावे ।।४६।।

जगी राहुनी पाहता अद्वैत रूप ।तोचि मानावा आत्मसाक्षात्कार देख ।

विदेह स्थिती हेची होत ।क्षणा क्षणा माझी पहा ।।४७।।

ऐसे आईचे बोल ।ते न व्हावे कदापि फोल ।

त्यांच्या वाक्याशी सदा डोल ।म्हणोनी कळकळ लागली ।।४८।।

म्हणून पुनरपी प्रार्थना करितो ।आईचे चरणी आता लोळतो ।

सेवेमध्ये देह झिजवितो ।रात्रंदिन आई गे ।।४९।।

तुझी तूची करून घ्यावी सेवा ।जीवाला हेची वळण लावा ।

अखंड असो आईचा धावा ।सर्वकाळ ।।५०।।

ऐश्या स्त्रोत्राचा पाठ करावा ।देहाचा उद्धार करोनी घ्यावा ।

आत्मसाक्षातकार मिळवावा ।आईचे कृपे ।।५१।।

एकावन्न मातृकांची साखळी ।सर्व तत्वा करी मोकळी ।

मायेची निघून जाईल पोकळी ।आत्मऽस्वरूप दिसेल पहा ।।५२।।

हे ओंकार स्वरूप पीठासन प्रकृती पुरुष ऐक्य भाव जाण ।

शिव शिवा स्वरूप प्रगट करून ।आत्मसाक्षात्कार देते पहा ।।५३।।

श्री रेणुकेचे एक रूपात होऊन दर्शन ।भक्तांचे पुरवी लळेजाण ।

आयुरारोग्य हे देऊन ।वास करी भक्त जवळी ।।५४।।

मात्र नाम चिंतन केले पाहिजे ।समोर श्री रेणुका ध्यान ठेविजे ।

गुरुकृपा पाठी मानिजे तेणेची सर्व साधेल ||५५||

|| इति श्री जोशी कुलोत्पन्न कृष्णतनय हरी विरचित प्राकृत

ओव्या योग पीठासन स्त्रोत्र || श्री जगदंबार्पणमस्तू ||

|| रेणुकामाता की जय ||

|| राजाधिराज योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराज की जय ||